आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
९ ऑगस्ट २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत छोडो आंदोलनाच्या ८४व्या वर्धापनदिनानिमित्त देशाचं हुतात्म्यांना अभिवादन

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते पुदुच्चेरी पोलीस दलाला राष्ट्रपती ध्वज प्रदान

- भारतीय बाजारपेठेत ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात १२ हजार ९२१ कोटी रुपयांची गुंतवणूक

- शांततेसाठी अमेरिकेबरोबर चर्चा पुढे सुरु ठेवण्याची इराणची सशर्त तयारी

- कोरियन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेचं विजेतेपद अश्मिता चलिहाने पटकावलं

आणि

- खराब हवामानामुळे अमरनाथ यात्रा अनिश्चित काळासाठी स्थगित

<><><><><>

भारत छोडो आंदोलनाच्या ८४व्या वर्धापनदिनानिमित्त विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहिली. महात्मा गांधींच्या करा किंवा मरा या हाकेतून प्रेरणा घेऊन स्वातंत्र्यसैनिकांनी स्वातंत्र्याच्या लढ्यात देशाला एकवटले. त्यांचं धैर्य, त्याग आणि देशभक्ती पिढ्यानपिढ्या प्रेरणा देत राहील, अशा शब्दात उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी अभिवादन केलं आहे. भारत छोडो आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभिवादन केलं आहे. या स्वातंत्र्यसैनिकांचं धैर्य प्रत्येक भारतीयासाठी सदैव प्रेरणा देत राहील, असं ते आपल्या संदेशात म्हणाले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हुतात्म्यांना अभिवादन केलं आहे. स्वातंत्र्यसैनिकांनी दाखवलेली देशभक्ती पिढ्यानपिढ्या प्रेरणा देत राहील. आजच्या ऑगस्ट क्रांती दिनी ज्यांच्या जिद्दीने आणि धैर्यामुळे भारत छोडो आंदोलन आणि भारताच्या स्वांतत्र्यलढ्याचा मार्ग बळकट केला, त्या असंख्य स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन असं ते आपल्या संदेशात म्हणाले आहेत.

देशभरात आजपासून हरघर तिरंगा हे अभियान सुरू झालं आहे. येत्या १७ तारखेपर्यंत चालणाऱ्या या मोहिमेत यंदा वंदे मातरम या भारताच्या राष्ट्रीय गीताच्या दीडशेव्या वर्धापन दिनाचंही औचित्य असणार आहे. या निमित्ताने देशभरात विविध ठिकाणी वंदे मातरमचं सामूहिक गायन, तिरंगा रॅली, प्रदर्शनं, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पुदुच्चेरी पोलीस दलाला राष्ट्रपती ध्वज प्रदान केला आणि देशाची अंतर्गत सुरक्षा अबाधित राखण्यासाठी या दलाने दाखवलेल्या समर्पण भावनेचं कौतुक केलं. ब्रिटिशांनी तयार केलेले फौजदारी कायदे रद्द करून केंद्र सरकारनं लागू केलेले तीन नवे फौजदारी कायदे, तंत्रज्ञान, कालबद्ध काम आणि विश्वास या तीन स्तंभांवर आधारलेले आहेत, असं ते म्हणाले.

**- - *होल्ड... बाईट- अमित शहा - -***

पुदुच्चेरीच्या विकासासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचंही शहा यांनी सांगितलं आणि गेल्या १२ वर्षांमध्ये त्या दिशेनं सरकारने केलेल्या विविध उपाययोजनांचा त्यांनी उल्लेख केला. पुदुच्चेरी पोलीस दलाला प्रतिष्ठेचा राष्ट्रपती ध्वज पुरस्कार मिळाल्याबद्दल शहा यांनी त्यांचं अभिनंदन केलं. लष्कराची तुकडी किंवा एखादं राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या पोलीस दलाला दिला जाणारा हा सर्वोच्च सन्मान आहे.

<><><><><>

परकीय गुंतवणूकदारांची भारतीय बाजारपेठेतली गुंतवणूक सातत्यानं वाढत असून ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात त्यांनी १२ हजार ९२१ कोटी रुपये भारतीय बाजारांमध्ये गुंतवल्याचं सीडीएसएलच्या अहवालात म्हटलं आहे. जुलै महिन्यात हा आकडा २० हजार २०० कोटी इतका होता. मार्च ते जून या काळात परदेशी गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात पैसे काढून घेतले होते. त्यानंतर सलग दुसऱ्या महिन्यात ही मोठी गुंतवणूक देशात आली आहे.

<><><><><>

मणिपूरमध्ये सुरक्षा दलांनी राबवलेल्या विविध मोहिमांमध्ये बंदी घातलेल्या कट्टरतावादी संघटनांशी संबंधित पाच सक्रिय सदस्यांना अटक केली आहे. त्यांच्यावर खंडणी

उकळणं, संघटनेसाठी नवीन सदस्यांची भरती करणं यांसारख्या कारवायांमध्ये सहभागी असल्याचा आरोप आहे.

<><><><><>

राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणानं देशभरातल्या ३३ राज्य जैवविविधता मंडळ, केंद्रशासित प्रदेशांमधल्या जैवविविधता परिषदा आणि राष्ट्रीय संस्थांना अॅक्सेस अँड बेनिफिट शेअरिंग अंतर्गत ३ कोटी रुपयांपेक्षा जास्त रुपयांचा निधी वितरीत केला आहे.

टोमॅटो, मिरची, वांगी तसंच साहिवाल जातीच्या गुरांचं गोठवलेलं वीर्य यासह भारतातील कृषी जैवविविधतेशी संबंधित विविध घटकांचा यात अंतर्भाव असल्याचं पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयानं कळवलं आहे. या निधी वितरणामुळे जैवविविधतेचं संवर्धन, वैज्ञानिष्ठ संशोधन आणि देशभरातील समृद्ध जैविक संसाधनांचे रक्षण करणाऱ्या समुदायांची उपजीविका यांच्यातला दुवा अधिक घट्ट होईल असं मंत्रालयानं म्हटलं आहे.
प्राधिकरणानं आतापर्यंत केलेल्या एकूण वितरण १६६ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी वितरीत केला असल्याची माहितीही मंत्रालयानं दिली आहे.

<><><><><>

अमेरिकेबरोबर शांततेची चर्चा पुढे सुरु ठेवण्यात आपल्याला रस आहे, मात्र यासाठी अमेरिकेला परस्पर विश्वासाचं वातावरण कायम ठेवावं लागेल, असं इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेश्कियान यांनी म्हटलं आहे. सामंजस्याने वागण्याची हीच योग्य वेळ आहे, आणि अमेरिकेच्या कृतीला अनुसरून इराण आपली वचनबद्धता पूर्ण करेल असं ते म्हणाले.

आपले अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी इराण चर्चा सुरु ठेवेल, मात्र कोणत्याही दबावाखाली आत्मसमर्पण करणार नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.

इराण आणि अमेरिकेनं गेल्या जून महिन्यात युद्धबंदीबाबतच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली होती. त्यानंतर दोन्ही देशांमध्ये चर्चेच्या फेऱ्या सुरु आहेत. मात्र, या अद्याप क्षेत्रात तणाव कायम आहे.

<><><><><>

युक्रेन आणि अमेरिकेनं 'पॅट्रियट' हवाई संरक्षण प्रणालीसाठी ‘प्रतिरोधक’ क्षेपणास्त्रांचा दरमहा पुरवठा करण्याबाबतचा करार केला असून, त्यानुसार अमेरिका, युक्रेनला दरमहा 'प्रतिरोधक' क्षेपणास्त्र पुरवेल. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी बेलग्रेडमध्ये

पत्रकारांना ही माहिती दिली. मात्र, हे प्रमाण देशाच्या हवाई संरक्षणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेसं नसल्याचं ते म्हणाले. मात्र त्यांनी यासंदर्भातील नेमकी आकडेवारी उघड केली नाही.

**<><><><>**

कोरिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीचं विजेतेपद भारताच्या अश्मिता चालिहाने पटकावलं आहे. आज ५३ मिनिटं चाललेल्या अंतिम सामन्यात तिने चीनच्या हान कियान क्षी चा १४- २१, २१-१४ , २१-१४ असा पराभव केला. पहिल्या गेममधे पिछाडीवर पडलेल्या अश्मिताने नंतर आक्रमक खेळ करत विजय मिळवला. यापूर्वी अश्मिताने २०२४च्या आशिया सांघिक विजेतेपद स्पर्धेत, तसंच २०१९च्या दक्षिण आशियाई क्रीडास्पर्धांमधे सुवर्णपदक मिळवलं आहे.

**<><><><>**

जम्मू-काश्मीरमध्ये पुढले काही दिवस हवामानाची स्थिती प्रतिकूल राहण्याची शक्यता लक्षात घेता, पहलगाम आणि बालताल या दोन्ही मार्गांवर सुरु असलेली अमरनाथ यात्रा स्थगित करण्यात आली आहे. गेले काही दिवस पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे यात्रेच्या दोन्ही मार्गांचं मोठं नुकसान झालं असून, या ठिकाणी  दुरुस्तीचं काम  सुरु आहे.

रामबन जिल्हा आणि काश्मीरच्या काही भागांत सुरू असलेला पाऊस आणि खराब हवामान लक्षात घेता, खबरदारीचा उपाय म्हणून काल जम्मूमध्ये  भगवती नगर बेस कॅम्पवरून यात्रेकरुंचा जत्था पुढे रवाना झाला  नाही.

यंदा  ४ लाखापेक्षा जास्त भाविकांनी अमरनाथच्या गुंफांना भेट दिली. अनंतनाग जिल्ह्यातला पारंपरिक चंदनवाडी मार्ग आणि गांदरबल जिल्ह्यातला बालताल मार्ग अशा दोन्ही मार्गांवरून ३ जुलै रोजी सुरु झालेल्या यंदाच्या अमरनाथ यात्रेची  सांगता २८ ऑगस्ट रोजी पारंपरिक 'छडी मुबारक' सोहळ्याने होईल.

**<><><><>**

देशाच्या विविध भागात मोसमी पाऊस सक्रीय असून अनेक ठिकाणी पूरस्थिती आहे. आसाममधे पुराचा फटका १२ जिल्ह्यांना बसला असून अजूनही जनजीवनावर त्याचा परिणाम जाणवत आहे. राज्यात अतिवृष्टीमुळे मरण पावलेल्यांची संख्या ९८ झाली आहे. अनेक ठिकाणी नद्यांचं पाणी अजूनही धोक्याच्या पातळीवरुन वाहत आहे. गावांमधून पुराचं

पाणी ओसरलं असलं तरी ठिकठकाणी अद्याप चिखल साचला आहे. राज्यात सुमारे साडेदहा हजार हेक्टर शेतजमीन अद्याप पाण्याखाली आहे. एनडीआरएफ आणि इतर यंत्रणांची पथकं मदतकार्य करत आहेत.

पश्चिम बंगालमधे बहुसंख्य जिल्ह्यात आज आणि उद्या विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना आणि वादळी पावसाची शक्यता आहे.

ओदिशात पुन्हा एकदा  पावसानं जोर धरला आहे. ४ जिल्ह्यांमधे हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट दिला आहे. नद्यांची पाणीपातळी वाढत असल्यानं काही दिवसांपूर्वी पुराचा फटका बसलेल्या भागात रहिवाशांमधे काहीसं चिंतेचं वातावरण आहे. प्रशासनाचं परिस्थितीवर बारीक लक्ष असून पूरप्रवण भागात मदतयंत्रणा तैनात करण्यात आल्या आहेत.

//<><><><><>//